Impact Factor – 6.261 | Special Issue – 180 | April 2019 | ISSN – 2348-7143
UGC Approved Journal List No. 40705

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S
RESEARCH JOURNEY
Multidisciplinary International E-research Journal

# SOCIAL AND SCIENCE INNOVATION

- EXECUTIVE EDITOR OF THE ISSUE -
Dinesh R. Jaronde

- CHIEF EDITOR -
Dr. Dhanraj T. Dhangar

Printed By : PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist - Gadchiroli

४२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बौद्धधर्म ........ १२४
शिला विठ्ठलराव डोंगरे
४३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान ........ १२६
प्रा. विलास महादेवराव वानखेडे
४४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मजुरांविषयीचे योगदान ........ १२८
वसंत नथू हिस्सल
४५. ग्रामीण कादंबरीतील प्रादेशिकतेनुसार बोली भाषेचे चित्रण ........ १३१
डॉ. शिवानंद मच्छिंद्र गिरी
४६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक बहुआयामी व्यक्तीमत्व ........ १३४
शिवाजी रामराव कराळे
४७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा धर्म व जातीविषयक दृष्टीकोन ........ १३७
डॉ. मनोहर तोटरे
४८. पुर्व विदर्भातील धान शेती ........ १३९
प्रा. घनश्याम राऊत, डॉ. प्रदीप घोरपडे
४९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व धर्मांतर ........ १४१
लता मोतीराम वाघमारे
५०. अमरावती विभागातील संत्रा कलम उत्पादनाचे मुल्यांकन ........ १४३
कु. प्रज्ञा रामभाऊ निंभोरकर
५१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार ........ १४६
रेणुका शिवाजी ईश्वरे
५२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार ........ १४९
प्रा. सोनाली खांडेकर
५३. हिंदू कोडबिल व डॉ. बाबासाहेब आंबेडकर ........ १५२
राजनंदिनी कैलास भालेराव
५४. मादक पदार्थाचे कुटुंब, समाज व व्यक्तीवर होणारे परिणाम : एक समाजशास्त्रीय अभ्यास (संदर्भ: मुदखेड तालुका) ........ १५४
प्रा. प्रकाश कोथळे
५५. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील पुनर्वसीतांच्या पुनर्वसन धोरणाचे अध्ययन ........ १५७
अमोल जगन्नाथ शेन्डे, डॉ. एस.एच. इंदूरवाडे
५६. डॉ. बाबासाहेब आणि धर्मांतर ........ १५९
वर्षा विठ्ठलराव तुरूकमाने
५७. ग्रामीण पर्यटन आणि ग्रामिण विकास ........ १६१
प्रा. निहार बोदेले
५८. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वैचारिक संदर्भ आणि दलित आत्मकथने ........ १६४
प्रा. डॉ. पदमाकर आ. पिटले
५९. महिलांचे घटनात्मक व कायदेशीर अधिकार आणि महिला सक्षमीकरण ........ १६८
प्रा. जगदिश रामदास चिमुरकर
६०. महाराष्ट्रातील आदिवासी महिलांची सद्यस्थिती आणि समोरील आव्हाने ........ १७०
ज्योती रामराव रामोड
६१. महिला व राजकारण ........ १७४
डॉ. राजेश्री एन. कडू
६२. महिला व राष्ट्रीय पातळीवरील राजकारण ........ १७७
प्रा. डॉ. आर. जी. बांबोळे
६३. मानवी अधिकार व महिला ........ १८०
प्रा. डॉ. रणधीर साठे
६४. ग्रामिण महिला व सक्षमिकरण ........ १८२
प्रा. मिलिंद हरीभाऊ ढाले
६५. डॉ.आंबेडकराचा शैक्षणिक दृष्टीकोन ........ १८४
प्रा. डॉ. अवथरे जयेश मो.



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli



137

RESEARCH JOURNEY Internationl Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor (SJIF) - 6.261 | Special Issue 180 : Social and Science Innovation
ISSN : 2348-7143
April 2019

# ग्रामीण पर्यटन आणि ग्रामिण विकास

प्रा. निहार बोदेले
अर्थशास्त्र विभाग
आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय, देसाईगंज, जि. गडचिरोली

**प्रास्ताविक :**

भारताच्या विकासाला गती देण्यासाठी मागील अनेक वर्षापासून विविध स्तरावर प्रयत्न केल्या जात आहेत. तसेच नवनवीन क्षेत्रात विकास व विस्ताराचे प्रयत्न होत आहेत. सरकार विकासाला गतीशिल करण्यासाठी नविन योजनासह तांत्रीक सहाय्यतेच्या आधारावर प्रयत्न करत आहे. या सर्व प्रयत्नाचे परिणामस्वरुप मागील अनेक वर्षापासून भारताच्या विविध क्षेत्रात आमुलाग्र स्वरुपाचे बदल झाल्याचे निर्देशनात येते, किंबहूणा अर्थव्यवस्थेच्या विकासात या क्षेत्रांचे योगदान व स्थान महत्वपूर्ण झाले आहे. या अनेक क्षेत्रापैकी पर्यटन हे विकासाच्या दृष्टीने महत्वाचे क्षेत्र आहे. भारतात पर्यटनासाठी मोठे कार्यक्षेत्र आहे. मागील काही वर्षात या क्षेत्रातील असणाऱ्या असिम संधी लक्षात घेवून विशेषत: रोजगारच्या दृष्टीकोनातून या क्षेत्राच्या विकासाकडे विशेष लक्ष पूरविले जात आहे. पर्यटन हे कोणत्याही देशाच्या विकासामध्ये एक महत्वाचे क्षेत्र ठरू शकते. पर्यटनातून रोजगार, उद्योजकता, शिक्षण, तंत्रज्ञान, आधारसंरचना, उत्पन्न वाढ इत्यादी बाबीवर सकारात्मक प्रभाव दिसून येतात.

अर्थव्यवस्थेच्या विभिन्न क्षेत्राचा विकास करतांना मात्र भारतासारख्या देशात जिथे कृषी क्षेत्र व ग्रामीण क्षेत्र महत्वपुर्ण आहे हे विकासाच्या प्रक्रियेत मागे पडत आहते. ग्रामीण क्षेत्रात विकासाच्या विभिन्न योजना असल्यातरी अस्तित्वात असलेले उपक्रम हे ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकास चक्राला गती देण्यास अपूरे पडत आहे. ग्रामीण विकासात ग्रामीण पर्यटन मैलाचा दगड ठरु शकते या क्षेत्रातील अफाट संभावना अलीकडे अधोरेखीत झाले आहे. निश्चितच ग्रामीण पर्यटन हे ग्रामीण विकासाचा एक महत्वाचा क्षेत्र ठरु शकते. संभवता त्याचे अर्थव्यस्थेवर व विशेषत: ग्रामीण विकासावरील परिणाम याबाबत या संशोधन लेखात तार्किक विचार व्यक्त करण्यात आले आहेत. प्रस्तुत संशोधन लेखात ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण विकास कसे साध्य करता येईल व ग्रामीण पर्यटनाचे ग्रामीण विकासावरील परिणाम याची चर्चा करण्यात आली आहे.

**पर्यटन व अर्थव्यवस्था :**

जागतीक GDP मध्ये पर्यटनाचा १०.४% वाटा २०१७ मध्ये होता त्यात २०१८ मध्ये ४% वाढ होण्याची संभावना आहे व जागतीक रोजगारात पर्यटनाचा वाटा २०१७ मध्ये ९.९% होता व त्यात २०१८ पर्यंत ३% वाढीची संभावना आहे. २०१७ मध्ये भारताच्या GDP मध्ये पर्यटनाचा वाटा ९.४% होता तर २०१८ मध्ये यात ७.५% वाढ झाली. रोजगारात पर्यटनाचा हिस्सा २०१७ मध्ये ८% होता व त्यात २०१८ मध्ये एकूण रोजगाराच्या ३.१% वाढीची शक्यता आहे व याक्षेत्रात २.१% प्रती वर्ष वृद्धीची संभावना आहे. पर्यटनाच्या दृष्टीकोनातून भारत प्रसिद्ध पर्यटन क्षेत्र आहे म्हणूनच जागतिक पर्यटनात भारताचा ७ वा क्रमांक लागतो. यामध्ये ग्रामीण पर्यटन याची भूमीका महत्वाची ठरू शकते.

**ग्रामीण पर्यटनाची संकल्पना :**

साधारणत: पर्यटन म्हटले की एखाद्या देशातील किंवा प्रदेशातील प्रसिद्ध व ऐतिहासीक वस्तू, नैसर्गीक स्थळ, नैसर्गिक कुतूहलाच्या बाबी, विभिन्न देशाच्या परंपरा, खान-पान, राहणीमान इत्यादी संबंधात यात्रा करणे होय. या पारंपारीक पर्यटनाला बगल देत निभिन्न भौगोलीक प्रदेशाच्या विशेषत: ग्रामीण क्षेत्राच्या विविधतेला पर्यटनाशी जोडणे म्हणजे ग्रामीन पर्यटन होय असे म्हणता येईल. ग्रामीन पर्यटनात विशेषत: विशिष्ट प्रदेशातील शेती करण्याची पध्दती, पिक, स्थानिक खान-पान, स्थानीक लोककला, संस्कृती, स्थानिक उत्सव किंवा सण, स्थानिक हस्त व्यवसाय यांना पर्यटनाशी जोडूने ग्रामीण पर्यटन म्हणून स्थापीत करणे म्हणजेच ग्रामीण पर्यटन होय.

**ग्रामीण पर्यटनांचे खालील प्रकार निश्चित करता येतील.**

१) **कृषी पर्यटन :** यात पर्यटकांना विशेषत: शहरी व विदेशी पर्यटकांना कृषी, शेती लागवड, शेतीतील विविध कामांच्या परंपरागत पध्दती इ. ची माहीती मिळते.

२) **संस्कृती पर्यटन :** पर्यटकांना स्थानिक प्रदेशातील विविध उत्सव, चाली-रिती, परंपरा, लोककला, नृत्य प्रकार, गायन प्रकार इत्यादी सारख्या संस्कृतीत बाबीची माहीती होवून ती परंपरा जगण्याची संधी उपलब्ध करुन देणे.

३) **प्रकृती पर्यटन :** ग्रामीण भागातील प्राकृतीक सौदर्याची जबाबदारीपूर्ण यात्रा करणे, ग्रामीन निर्सगातील विविधतेचा आनंद लुटणे व त्यांच्या संरक्षणा संबंधी जागरुक राहूण स्थानिक लोक कल्याण व पर्यावरण संरक्षणाची स्थानिक परंपरा या बाबत लोकांना जागरुक करणे.

४) **साहसिक पर्यटन :** बऱ्याच पर्यटकांना त्यांच्या शारीरीक क्षमतांच्या सिमा वाढविण्यासाठी नैसर्गीक स्वरुपाच्या साहसिक पर्यटनाची आवश्यकता असते अशा पर्यटकांना संधी साहसीक पर्यटनातून प्राप्त होईल.

**खानपान पर्यटन :** भारतात अनेक बाबतीत विविधता दिसते त्यात भोजन व व्यंजनाची विविधत: हे खास आहे. विशिष्ट व्यंजन हे विविध प्रदेशाची ओळख असते त्या प्रदेशाची विशेषत: त्या व्यंजनात दिसून येते. काही व्यंजन विशिष्ट औचिरत्याचे तर काही व्यंजनाला



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli
138

ISSN : 2348-7143 April 2019 RESEARCH JOURNEY Internationl Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor (SJIF) - 6.261 | Special Issue 180 : Social and Science Innovation

प्राचीन परंपरा लाभलेली असते या व्यंजन व भोजनातील विविधतेचा आनंद घेता येतो व त्याची माहीती मिळविता येते.

**पर्यावरण पर्यटन :** हे पर्यटन विशिष्ट उद्देशानुसार केले जाते. विशिष्ट भुप्रदेशाची पर्यावरण व त्याचा जनजीवनावरील प्रभाव याचा अभ्यास, यात्रा, संरक्षण या पर्यटनातून करता येते.

**जातीय पर्यटन :** या पर्यटनातून विविध संस्कृती व लोकजीवनाच्या कक्ष रुंदावता येतात. या माध्यमातून विभिन्न लोकजीवनाच्या पध्दती व संस्कृती बाबत माहीती मिळविता येते, त्यांचे वास्तविक जीवन अनुभवता येते.

या सर्व पर्यटनातून व्यक्तीला देशाच्या विविध भुप्रदेशाचे, व त्यातील विविधतेचे अनूभव व अभ्यास करणे शक्य होते. या माध्यमातून ग्रामीण विकासाची वाटचालाची दिशा सुकर करण्यास मदत होईल.

**ग्रामीण पर्यटनाचे ग्रामीण विकासावर परिणाम :**

कृषी व्यतिरीक्त ग्रामीण विकासाचे ग्रामीण पर्यटन हे एक महत्वाचे साधन आहे. या पर्यटनातून ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विविध घटकाला प्रभावित करून ग्रामीण विकासाला वरच्या स्तरावर नेण्यासाठी ग्रामीण पर्यटन कसे सहाय्यक आहे हे खालील मुद्दयावरून स्पष्ट करता येईल.

१) **ग्रामीण रोजगार :** ग्रामीण पर्यटनाचा सर्वात महत्वाचा प्रभाव हा ग्रामीण रोजगार उपलब्धतेवर दिसून येतो. कृषी व्यतीरीक्त ग्रामीण पर्यटनातून नवनवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. ज्यात पर्यटन गाईड, वाहतूक, भोजन व निवास, हस्त कौशल्याच्या वस्तू निमिर्ती उद्योग व इतर प्रकारच्या सेवा इत्यादीमध्ये रोजगार निर्माण होईल.

२) **शेतीवरील भार कमी :** ग्रामीण पर्यटनामूळे शेतीतील अतिरिक्त लोकसंख्या गांमीण पर्यटनाच्या क्षेत्राकडे वळविण्यास मदत होवून त्यामुळे शेतीवरील भार कमी होईल व शेतीची उत्पादकता वाढीस मदत होईल.

३) **वाहतूक सोईचा विकास :** ग्रामीण पर्यटनामूळे ग्रामीण भागात विविध वाहतूकीच्या सोईचा विकास होण्यास मदत होईल. ग्रामीण क्षेत्र हे शहराशी जोडल्या जातील व त्यामूळे ग्रामीण क्षेत्राचा विकासाला गती प्राप्त होईल.

४) **आधारभूत संरचनाचा विकास :** ग्रामीण पर्यटनामूळे जिथे विविध पर्यटकाच्या येणाऱ्याची संख्या वाढून ग्रामीण भागात रस्ते, विज, पाणी, संचार, हॉस्पीटल व शिक्षण इ. आधारभूत संरचनेचा विकास होईल.

५) **ग्रामीण बाजाराचा विकास :** पर्यटकाच्या गर्दीमुळे ग्रामीण बाजाराचा विकास होवून ग्रामीण भागात नवनवीन व्यापार व्यवसाय वाढीस लागून ग्रामीण भागातील हस्तकौशल्याच्या वस्तू, परंपरागत व स्थानिक उत्पादीत वस्तू विकण्यासाठी मोठी बाजारपेठ उपलब्ध होईल.

६) **हस्तकौशल्याच्या वस्तूचा उद्योगाचे पूनरजीवन :** पर्यटकांना स्थानिक हस्त कौशल्याच्या वस्तुच्या बाबत नेहमीच कुतूहल व आकर्षन वाटते. त्यामूळे ग्रामीण भागातील हस्त कौशल्याच्या वस्तूंना ग्राहक उपलब्ध घेवून ग्रामीण उत्पादक आपल्या वस्तू पर्यटकांना सरळ विकू शकतात त्यामाध्यमातून त्यांच्या वस्तुचा प्रचार व प्रसार होईल. त्यांची उत्पादकता वाढेल त्यातून नविन रोजगार निर्माण होईल व हस्तकौशल्याच्या वस्तू उद्योग जीवंत राहतील.

७) **शिक्षणाचा प्रसार :** ग्रामीण भागात पर्यटकाच्या येण्यामुळे आचार विचाराचे आदान प्रदान होवून नवसंकल्पना, नवप्रवर्तन, आधूनिक उपकरणे व नैसर्गिकज्ञान, आधूनिक सुविधा वापराकडे ग्रामीणचा कल निर्माण होनून शिक्षण घेण्याबाबत सकारात्मकता निर्माण होईल व त्यातून शिक्षणाचा प्रचार व प्रसार होण्यास मदत होईल.

८) **ग्रामीण स्वच्छता :** लोकांचे पर्यटकाशी सरळ संबंध प्रस्थापीत होतो त्यामुळे पर्यटकांना स्वच्छ व सुंदर वातावरण उपलब्ध व्हावा म्हणून ग्रामीण लोकांमध्ये स्वच्छते बाबत जागृती निर्माण होईल व ग्रामीण स्वच्छेतेवर भर दिला जाईल. त्यातून ग्रामीण स्वच्छतेच्या समस्या दुर होवून आरोग्य सुदृढ होण्यास मदत होईल.

९) **पर्यावरणाबाबत संरक्षण :** ग्रामीण भागातील लोकांमध्ये पर्यावरणाबाबत जागृती निर्माण करण्यास पर्यटकांची मदत होवून, लोक आपल्या सभोवतील वातावरणाच्या बाबत सजग होतील. त्यांच्या जीवनावरील पर्यावरणाचा प्रभाव त्यांच्या लक्षात येवून त्यांच्या संरक्षणाबाबत ते जागृत होतील.

१०) **मानव विकास निर्देशांकात सुधारणा :** भारतासारख्या देशात जिथे ग्रामीण भागात मानवी विकास निर्देशांक अत्यंत कमी आहे. ग्रामीण पर्यटनामूळे शिक्षण, आरोग्य, आहार व प्रतीव्यक्ती उत्पन्न इत्यादी बाबतीत सुधारणा होवून ग्रामीण भागातील मानव विकास निर्देशांकात सुधारणा घडवून आणण्यासाठी मदत होईल.

एकंदरीत ग्रामीण पर्यटन ही ग्रामीण विकासाचा मार्ग सुकर होण्यास मौलाची भूमीका बजाऊ शकते. भारतासारख्या देशात जिथे ७५% लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास असतांना ग्रामीणक्षेत्रात विकास केवळ कृषीवर येवून पडतो व मागील अनेक वर्षापासून कृषी विकासाचे प्रयत्न केले गेले परंतू या विकासाला मर्यादा निर्माण झाल्या आहेत. परिणामास्तव ग्रामीण जिवन अतिशय कष्टदायक झाले आहे. ग्रामीण विकासाला कृषी सहायक आधारावर गतीमान करण्यासाठी ग्रामीण पर्यटन निश्चितच सहाय्य ठरले.

ग्रामीण पर्यटनाचा सर्वात प्रभावी परिणाम ग्रामीण बेकारीला दुर करण्यासाठी होईल. या पर्यटनामून ग्रामीण समस्यांवर संशोधन



Adarsh Arts & Commerce College (Desaiganj)
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

करण्याची संधी उपलब्ध होईल. ग्रामीण तांत्रीक ज्ञानाच्या स्तरात वृध्दी होवून त्याचा प्रभाव ग्रामीण उत्पादकतेवर दिसून येईल. ग्रामीण व्यवसाय, कला, साहित्य व कौशल्याच्या वैश्वीकरणाची सधी ग्रामीण पर्यटनातून निर्माण होईल. विविध जाती धर्माच्या व प्रदेशाच्या लोकांच्या संपर्कातून सामाजिक सदभाव निर्माण होईल व त्याचा ग्रामीण वातावरणावर सकारात्मक प्रभाव पडून ग्रामीण लोंकामध्ये स्वाभिमान व सहकार्य निर्माण होण्यास मदत होईल. अशा अनेक सकारात्मक बाबी ग्रामीण पर्यटनातून ग्रामीण भागांत घडून येवू शकतात व कृषी व्यतिरिक्य ग्रामीण विकासाचे अनेक मार्ग व संधी त्या क्षेत्रातील लोकांना प्राप्त घेवून ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाला वरच्या स्तरावर नेण्यास मदत होईल.

**निष्कर्ष :**

भारताचा एकूण ग्रामीण क्षेत्र लोकसंख्येच्या दृष्टीकोणातून ८५: च्या आसपास आहे व अर्थव्यवस्थेच्या एकूण उपभोगावर या क्षेत्राचा मोठा प्रभाव आहे. परंतु या क्षेत्रात उत्पन्नाचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या साधन केवळ कृषी हाच आहे. या व्यतिरीक्त या क्षेत्रात उत्पन्न व रोजगार मिळविण्याचे अन्य पर्याय नाही. अलीकडे कृषी क्षेत्राची वास्तविकता ही सर्वसमक्ष आहे. कृषी क्षेत्राच्या विकासाच्या कक्षा स्थिरावलेल्या अवस्थेत येवून पोहचले आहे असे म्हणणे कदाचित अतिशयोक्ती होणार नाही, कृषीचा मागासलेपणा, जमीनीचा आकार क्षेत्र, पिक पद्धती, कृषी व लोकसंख्या याच्यातील असंतुलन, निसर्गाची लहरीपणा, कृषी किंमत धोरण व कृषी आधार संरचना व इतरही बाबीचा कृषीच्या विकासावर परिणाम होवून कृषी विकास मर्यादीत झाले आहे म्हणूनच ग्रामीण क्षेत्राच्या विकासासाठी कृषी सह नविन क्षेत्राचा व नविन पर्यायाचा विचार व विकास होणे गरजेचे आहे. या परिस्थीतीमध्ये ग्रामीण पर्यटन एक महत्वाचे क्षेत्र ठरुन. जे ग्रामीण विकासाला पूढच्या स्तरावर नेवू शकेल. ग्रामीण पर्यटनाव्दारे कृषीवरील भार कमी करून रोजगार व उत्पन्न मिळविण्याचे पर्याय उपलब्ध करता येतील. पर्यटनाचे क्षेत्र विविधांगी स्वरूपाने ग्रामीण विकासाला हातभार लावून ग्रामीण उन्नती साधण्यास सहाय्यक ठरू शकेल. रोजगार व उत्पन्नाच्या साधनातील विविधता, शिक्षण ,आधारभुत संरचना, आरोग्य सेवा, वाहतुक सेवा व अन्य सेवा यासंबधीत ग्रामीण रागरया दूर होवून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करता येईल व त्यातून ग्रामीण विकास साध्य करता येईल.

Refence :

1. Annual Report – 2017-18 Ministry of Tourism Govt. of India
2. Jitendra Singh, Dr. J. S. Narban, (2015)/ rural tourism in india-a model of rural culture and heritage!, IJARIIE-Vol-1 Issue-5 2015, ISSN(O)-2395-4396
3. Kashyap, P., & Raut, S. (2005). The rural marketing book ( Text & Practice) Dreamtech Press.
4. http://www.un.org/en/bptable.html
5. www.economictimes.indiatimes.com
6. www.mohanam.org

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli